२० एप्रिल २०१४

१९ ऑप्रिल च्या weekend ला राधानगरी येथील एकांत या स्थळा मध्ये आम्ही एकत्र येण्याचे ठरवल्यापासूनच त्या दिवसाची आम्ही सर्वजण वाट पहात होतो.

मुंबई व पुणे यासारख्या गजबजलेल्या शहरातील रोजच्या गतिमान व धकाधकीच्या दिनक्रमातून इथे येऊन पोहोचलो आणि खरंच जो शब्द "एकांत" आम्ही विसरूनच गेलो होतो, त्याचा अक्षरशः प्रत्यय इथे आल्याआल्याच झाला. लाल मातीचा रस्ता, आजूबाजूला ऊस, सूर्यफुलाची शेती ठिकठिकाणची मचाणं पहाता पहाताच एकांत या डाकबंगल्या वर पोहोचलो. इथला परिसर, सारवलेल्या जमिनी, इथल्या पर्णकुट्या, आंबा, फणस, काजू रायआवळे आदि वृक्ष निरनिराळी फुले, पक्षी व इथली non poluted, थंड हवा या सर्वामुळे आम्ही एकांत च्या प्रेमात पडलो.

इथली रहाण्याची व्यवस्था तर एखाद्या five star hotel च्या तोडीची आहे एवढच इथे विविध रुचकर पदार्थ तुम्हाला प्रेमाने, आग्रहाने खाऊ घातले जातात एवढाच फरक. ज्यांनी या दोन दिवसात आम्हाला रुचकर पदार्थांचा आनंद दिला त्या ताई व दादांचे खूप खूप आभार..

सागर सदैव आमच्या दिमतीला हजर.. त्यांनी आम्हाला राधा नदी, डॅम, काजूच्या बागा इत्यादि स्थळांची सफर थोड्या अवधीत घडवून आणली त्याबद्दल त्यांचे कौतुक व मनःपूर्वक आभार

गौरीताई now last but not least तुमचे आभार मानताना एक सांगते हा एकांत सोडून जरी आम्ही निघालोय तरी इथे पुन्हा परत, परत येण्यासाठी .......

सौ. दुर्गा मंगळवेढेकर
दुर्गा